Regd. No. 6946 Estd. 19-1-1931

# THE HIGH COURT EMPLOYEES' CO-OP. CREDIT SOCIETY LTD.

MUMBAI Tel. : 22693480




।। सहकारात् समृध्दीः ।।

# 89th Annual Report 2019

Email : highcourtsociety@yahoo.in
Web. : www.hcesociety.org

# The High Court Employees' Co-op. Credit Society Ltd.
# Mumbai

## Board Of Directors

**2015 - 2020**



**Shri. Sunil K. Shinde**
*Chairman*



**Smt. Shonali K. Dighe**
*Vice Chairman*



**Shri. Deepak S. Dhumal**
*Secretary*



**Smt. Seema R. Desai**
*Joint Secretary*



**Shri. Rajendra E. Khilari**
*Treasurer*



**Shri. Sandesh S. Shinde**
*Sub Treasurer*



**Shri. Balkrishna M. Ghone**
*Director*



**Shri. Bharat J. Mulik**
*Director*



**Shri. Ravindra S. Dongre**
*Director*



**Shri. Chandrakant S. Karambale**
*Director*



**Smt. Vaishali P. Pandey**
*Director*



**Shri. Ravi B. Pawar**
*Director*



**Shri. Santosh S. Pawar**
*Director*



**Shri. Sanjay A. Belose**
*Manager*

## The High Court Employees' Co-op. Credit Society Ltd., Mumbai

## NOTICE

To,
The Members,
The High Court Employee's Co-op. Credit Society Ltd., Mumbai.

The 89th Annual General Meeting of the Society will be held on Tuesday the 20th August 2019 at 5.40 p.m. (S.T.) in Court Room No. 21 of the High Court Main Building to transact the following business.

1. To read and confirm the minutes of last Annual General Meeting.
2. To Consider the leave of absence of members for not attending the Annual General Body Meeting.
3. To Accept the Compliance report on finding's the statutary Auditor for the year 2017-18.
4. To read and adopt the report and the Audited Statement of Accounts for the year ended 31st March 2019.
5. To Read and accept the statutory Auditor's Report for the year 2018-19 and Internal Auditor's Report for the year 2018-19.
6. To declare Dividend on Shares and other Profit for the year 2018-19.
7. To Appoint Internal and Statutory Auditor's for the year 2019-2020 and to fix their remuneration.
8. To receive and adopt the Budget for the year 2019-2020.
9. To Approve new rules of Loan Secure Fund.
10. To consider and approve amendments to rules of Member's welfare fund.
11. To consider any other business brought forward with the permission of the Chair.

Shri. D. S. Dhumal – Secretary
Date : 30th July 2019 Smt. S. R. Desai – Jt. Secretary

**N. B.:**

1. If the above meeting is adjourned for want of quorum the same will be held thirty minutes thereafter and no quorum will be required for that meeting.
2. The minutes of the Annual General Meeting held on 28/08/2018, compliance report on findings by the statutory Auditor for the year 2017-18, statutory Auditors Report F.Y. 2018-19, Internel Auditors Report F.Y. 2018-19 and Audited Statement of Accounts are available to members for inspection in the Society's office from 06/08/2019 to 13 /08/2019 during office hours on working day.
3. Members are requested to supply in the office not later than 14th August 2019, written copies of any questions or information they desire to have and intended to be discussed at the Annual General Meeting. Abruptly asked questions in A.G.M. will not be entertained.
4. Members are here by noticed that the Dividend, if not claimed within three years from the date it becomes due for payment is liable to be transferred to Reserve fund.

# दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

## नोटीस

प्रति,

सभासद,

दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

वरील सोसायटीची ८९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी सायंकाळी ठिक ५.४० वाजता उच्च न्यायालयाच्या मुख्य इमारतीमधील २१ क्रमांकाच्या खोलीमध्ये होणार आहे. त्यावेळी खालील कामे करण्यात येतील.

१. गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असणाऱ्या सभासदांची रजा क्षमापित करणे.

३. आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.

४. दि. ३१/०३/२०१९ अखेर संपणाऱ्या वर्षाचा सोसायटीचा वार्षिक अहवाल, नफा-तोटा, ताळेबंद पत्रके वाचुन मंजूर करणे.

५. सन २०१८-१९ च्या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि सन २०१८-१९ या वर्षाचा अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल वाचुन स्विकृत करणे.

६. सन २०१८-१९ या सालामध्ये झालेल्या नफ्याची वाटणी मंजूर करणे.

७. सन २०१९-२० या वर्षाकरिता अंतर्गत आणि वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८. सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

९. कर्ज सुरक्षा निधिच्या नविन नियमावलीस मंजूरी देणे.

१०. सभासद कल्याण निधीच्या नियमावलीत दुरुस्त्या मंजूर करणे.

११. अध्यक्षांच्या परवानगीने इतर कामे पुढे आल्यास त्यांचा विचार करणे.

श्री. दी. शं. धुमाळ : कार्यवाह

ता. ३० जुलै २०१९

श्रीमती. सी. रा. देसाई : सहकार्यवाह

वि. सूचना :

१. गणसंख्येपूर्ती अभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व तिला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. दि. २८/८/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त, आर्थिक वर्ष २०१७-१८ चा वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल, सन २०१८-१९ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, सन २०१८-१९ सालचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल त्याचप्रमाणे हिशेब तपासनिसांनी तपासलेले संस्थेचे हिशेब सभासदांच्या निरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयात दि. ०६/०८/२०१९ ते १३/०८/२०१९ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे वेळेत उपलब्ध आहेत.

३. वार्षिक सभेमध्ये ज्या सभासदास प्रश्न विचारायचे असतील किंवा माहिती हवी असेल तर तत्संबंधी दि. १४ ऑगस्ट २०१९ चे आत कार्यालयात लेखी कळविण्याबद्दल विनंती आहे. अकस्मात विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

४. सभासदांचे लक्ष वेधण्यात येते की, नफा वाटणीची रक्कम मंजूर झालेल्या तारखेनुसार ३ वर्षांच्या आत न नेल्यास ती रक्कम राखीव निधीमध्ये जमा करावी लागते.

## दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,
## मुंबई - ४०००३२.

# ★ ८९ वा वार्षिक अहवाल ★

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल व आर्थिक पत्रके आपणापूढे सादर करताना अतिशय आनंद होत आहे. संस्थेने आपल्या कारकिर्दिच्या ८९ वर्षाची वाटचाल यशस्वीरित्या पूर्ण केलेली असून, आर्थिक प्रगतीचा वेग सातत्याने कायम ठेवलेला आहे. संस्था प्रगतीपथावर ठेवण्यात सभासदांचाही मोलाचा हातभार आहे. त्यांच्याकडून यापुढेही असेच सहकार्य मिळत राहील अशी अपेक्षा आहे.

<u>सभासद</u> : दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर एकूण सभासद २२२६ होते. अहवाल साली १३९ नवीन सभासद झाले व सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू इत्यादी कारणात्सव १२१ सभासद पटावरून कमी झाले. दि. ३१ मार्च २०१९ अखेर २२४४ सभासद पटावर आहेत.

<u>भाग भांडवल</u> : वर्षारंभी संस्थेचे वसुल भाग भांडवल ₹ १६,१८,३६,५९०/- होते. अहवालसालात त्यात ₹ २,०५,७२,२००/- एवढी रक्कम जमा झाली. व ₹ १,०४,१५,८८०/- एवढी रक्कम सभासदांना परत करण्यात आली दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकूण ₹ १७,१९,९२,९१०/- एवढे वसुल झालेले भागभांडवल जमा आहे.

<u>ठेवी</u> : वर्षारंभी संस्थेच्या मुदतठेवी ₹ २,१५,८४,३१३/- एवढ्या जमा होत्या त्यामध्ये अहवालासालात ₹ १,३०,१३,८३६/- एवढी रक्कम जमा झाली. व ₹ १,८१,८२,६६३/- एवढी रक्कम सभासदांना परत करण्यात आली. दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकूण ₹ १,६४,१५,४८६/- एवढ्या रक्कमेच्या मुदतठेवी संस्थेत जमा आहेत.

<u>आवर्त ठेवी</u> : आवर्त ठेवी पोटी सभासदांची दि. ३१ मार्च २०१९ अखेर ₹ २०,५८,०००/- एवढी रक्कम संस्थेत जमा आहे. त्याचप्रमाणे वाढत्या बचत ठेवी पोटी सभासदांची दि. ३१ मार्च २०१९ अखेर ₹ ५,२३,२०,९६५/- एवढी रक्कम संस्थेत जमा आहे. त्याचप्रमाणे जामिनदारांकडून कर्ज परतफेडीपोटी कापुन घेतलेली ₹ १,३३,९६७/- एवढी रक्कम दि. ३१ मार्च २०१९ अखेर संस्थेत जमा आहे.

संस्थेकडे सध्या सभासदांच्या कर्जमागणी एवढा पुरेसा निधी सभासदांच्या मासिक वसुली पत्रकाद्वारे जमा होत असल्याने अतिरिक्त निधीची आवश्यकता भासत नाही अतिरिक्त निधी जर बँकेत गुंतविला तर त्यावर आयकर भरण्याबाबत नोटीस येण्याची शक्यता असल्याने संस्थेने मुदत ठेव व आवर्त ठेव या योजना तात्पूरत्या स्वरुपात बंद केलेल्या आहेत. ज्या ज्या वेळी कर्जमागणीकरीता अतिरीक्त निधीची आवश्यकता असेल त्या त्या वेळी मुदतठेव योजना सुरु करण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या वतीने घेण्यात येईल.

**<u>राखीव निधी :</u>** वर्षारंभी संस्थेचा राखीव निधी ₹ ३,८४,९५,२६३.०१/- एवढा होता. सहकार खात्याने २०१७-१८ च्या नफ्यातुन १०% एवढी रक्कम राखीव निधी खात्याला वर्ग करण्याबाबात मंजूरी दिल्याने ₹ २५,६२,०५५/- एवढी रक्कम आणि सभासदांनी घेवून न गेल्यामुळे नियमानूसार गंगाजळी मध्ये वर्ग करण्यात आलेली तीन वर्षामागील लाभांश व वाढत्या बचत ठेवीवरील व्याज ₹ २,३५,८४७/- एवढी रक्कम त्याचप्रमाणे अहवाल सालातील जमा झालेली प्रवेश फी ₹ १३,९००/- एवढी रक्कम राखीव निधीला वर्ग करण्यात आल्यामुळे दि. ३१ मार्च २०१९ अखेर राखीव निधी ₹ ४,१३,०७,०६५.०१/- एवढा झालेला आहे.

**<u>इतर निधी :</u>** वर्षारंभी संस्थेच्या इतर निधी ₹ १,९१,५०,४९८/- एवढ्या होत्या दि. ३१ मार्च २०१९ अखेर त्या ₹ २,३१,०२,७९९/- एवढ्या झाल्या आहेत. सहकार खात्याने सन २०१७-१८ च्या नफ्यातुन १२% म्हणजेच ₹ २७,९४,९६८/- एवढी रक्कम आकस्मिक निधीला व २% म्हणजेच ₹ ४,६५,८२८/- एवढी रक्कम सभासद कल्याण निधीला वर्ग करण्याबाबत मंजूरी दिलेली आहे.

| इतर निधी तपशील | वर्षारंभी जमा | वर्गणीद्वारे जमा | नफा विभागणी मधून जमा | सन २०१७-१८ साली खर्च | ३१ मार्च २०१९ अखेर जमा |
|---|---|---|---|---|---|
| बुडीत येणे निधी | १५,००० | — | — | — | १५,००० |
| गुंतणावळ घसारा निधी | १०,००० | — | — | — | १०,००० |
| आकस्मिक निधी | ४३,७८,८३४ | — | २८,९४,९६८ | — | ७२,७३,८०२ |
| सभासद कल्याण निधी | १,०६,५०,१५४ | १४,२३,६६५ | ६,६५,८२८ | १२,०९,०४५ | १,१५,३०,६०२ |
| मयत सभासद मदत निधी | २२,९६,५१० | १,३१,८८५ | ५०,००० | ९०,००० | २३,८८,३९५ |
| लाभांश समानिकरण निधी | १८,००,००० | — | ८५,००० | — | १८,८५,००० |
| एकुण | १,९१,५०,४९८ | १५,५५,५५० | ३६,९५,७९६ | १२,९९,०४५ | २,३१,०२,७९९ |

**<u>गुंतवणूक :</u>** वर्षारंभी संस्थेची गुंतवणूक ₹ ५,५३,७४,३५८/- एवढी होती, केंद्र सरकारचे गुंतवणूकीवरील मिळणाऱ्या व्याजाबाबत असलेले आयकर धोरण पहाता संस्थेने गुंतवणूक कमी करुन ती रक्कम सभासदांना कर्ज देण्याकरीता उपयोगात आणली आहे. त्यामुळे दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकूण गुंतवणूक ₹ ४,१३,६७,०७७/- एवढी झालेली आहे.

**<u>दिर्घ मुदत / विशेष कर्ज :</u>** दि. ३१ मार्च २०१८ रोजी सभासदांकडून ₹ २४,४२,७८,७८१/- एवढे कर्ज येणेबाकी होते. अहवाल वर्षात ₹ १४,६९,४४,४००/- चे कर्ज वाटप करण्यात आले. व ₹ ११,६४,७२,६८४/- चे कर्ज वसुल झाले. दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत सभासदांकडून ₹ २७,४७,५०,४९७/- एवढे कर्ज येणे बाकी आहे.

संस्थेने मागील वर्षापासून नवीन सभासदांना देखील १ वर्ष झाल्यानंतर ₹ ६,००,०००/- व ५ वर्ष झाल्यानंतर ₹ १२,५०,०००/- पर्यंत कर्ज देण्यास सुरुवात केलेली आहे. परंतु ही कर्ज देताना त्यांची जमा रक्कम संस्थेत १०% एवढीच असते त्यामुळे कर्ज घेणाऱ्या कर्जदाराचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कडून येणे असलेली कर्ज रक्कम वसुल होवू शकत नाही. अशावेळी जामिनदारांच्या पगारातून ती रक्कम वसुल करण्यात येते. जामिनदार अशा कर्जदारांकरीता भरडला जावू नये म्हणून संस्थेने कर्ज सुरक्षा निधी ही विमा योजना कर्जदार सभासदांकरीता आपल्या समोर आणलेली आहे. (पान क्र. ११ ते १३) तरी आपण सर्वानी ही योजना समजून घेऊन त्याला मान्यता द्यावी अशी आपणास विनंती आहे.

**अल्पमुदत कर्ज :** दि. ३१ मार्च २०१८ रोजी सभासदांकडून ₹ १,३९,२०,६०६/- एवढे अल्पमुदत कर्ज येणेबाकी होते. अहवाल वर्षात ₹ १,४८,६२,५००/- चे कर्जवाटप करण्यात आले व ₹ १,३०,१४,१८१/- चे कर्ज वसुल झाले दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत सभासदांकडून ₹ १,५७,६८,९२५/- एवढे कर्ज येणे बाकी आहे. या कर्जाकरीता देखील कर्ज सुरक्षा निधी ही योजना आणलेली आहे त्याला देखील मान्यता द्यावी अशी आपणास विनंती आहे.

**तातडीचे कर्ज :** दि. ३१ मार्च २०१८ रोजी सभासदांकडून ₹ ११,८१,८५०/- एवढे तातडीचे कर्ज येणे बाकी होते. अहवाल वर्षात ₹ २८,६०,४००/- चे कर्जवाटप करण्यात आले. व ₹ २८,३०,१५०/- चे कर्ज वसुल झाले. दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत सभासदांकडून ₹ १२,१२,१००/- एवढे कर्ज येणेबाकी आहे.

**लेखापरिक्षण :** अहवाल सालचे अंतर्गत लेखा परिक्षण श्रीमती तृप्ती एन. बगाडे, चार्टर्ड अकौन्टन्ट (मेंबरशिप नं. १५४४७३) यांनी केले असून त्यांनी आपला अहवाल वेळेत सादर केलेला आहे. वैधानिक लेखापरिक्षण श्री. चंदन गुप्ता (सनदी लेखापाल, सहकार पॅनेल क्र. १०१५७३९) यांनी पूर्ण केले असून त्यांनी संस्थेला "अ" ऑडिट वर्ग दिला आहे. संस्थेचे सन २०१८-१९ चे टॅक्स ऑडिट श्री. रामकृष्ण धावडे, चार्टर्ड अकौन्टन्ट (मेंबरशिप नं. १०४७९४) यांनी पूर्ण केलेले आहे. संस्था या सर्वांचे आभारी आहे.

**संचालक मंडळ सभा :** अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या असून या सर्व सभेमध्ये संचालक मंडळाने सभासदांच्या हिताचे निर्णय घेतलेले आहेत.

**संचालकांना दिलेली कर्जे:** संस्थेच्या संचालकांना दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत देण्यात आलेल्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| ३१/३/२०१८ पर्यंत असलेली कर्जे | ₹ ४६,२६,६००/- |
| ३१/३/२०१९ पर्यंत बाकी असलेली कर्जे | ₹ ४२,२४,९५०/- |
| कर्जापोटी थकबाकी | काहीही नाही |

संस्थेचे संचालक हे मुळ सभासद असल्याने त्यांना सर्व सभासदांप्रमाणे कर्ज दिली आहेत. नियमाबाहेर कोणालाही कर्ज न देता त्यांना व्याज दरात देखील कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही.

**खेळते भांडवल :** संस्थेचे खेळते भांडवल गतवर्षीपेक्षा ₹ १,४६,७१,५४६/- ने वाढून ते ₹ ३३,९३,०४,४३३.१२/- एवढे झालेले आहे.

**नफा विनियोजन :** सन २०१८-१९ या वर्षात संस्थेला ₹ २,३५,२१,९०१.९४/- इतका नफा झालेला असुन गतवर्षीचा शिल्लक नफा ₹ १३,७३५.१७/- धरुन ₹ २,३५,३५,६३७.११/- इतका नफा विनियोजनासाठी उपलब्ध आहे. सदर नफ्याचे विनियोजन पुढीलप्रमाणे करण्याविषयी संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| १. राखीव निधि (नफ्याच्या २५%) | ₹ ५८,८०,४७६.०० |
| २. लाभांश (१०% प्रमाणे) | ₹ १,७६,५२,३८७.०० |
| ३. शिल्लक नफा पुढील वर्षाकरीता | ₹ २,७७४.११ |
| एकूण | ₹ २,३५,३५,६३७.११ |

## सभासदांसाठी

१. संस्थेने सर्व प्रकारचे फ्रँकींग केलेले कर्ज फॉर्मस् संस्थेच्या कार्यालयातून देण्यास सुरुवात केलेली आहे. तरी सभासदांनी ₹ १२५/- रोख रक्कम देऊन हे फ्रँकींग केलेले कर्ज फॉर्मस् आवश्यकतेनूसार घेऊन जावेत.

२. जे सभासद सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त होत असतील व त्यांची संस्थेचे सभासद होऊन १५/२० वर्ष पूर्ण झाली असतील तर अशा सभासदांना सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत ₹ ५००० / ₹ ७५०० एवढी रक्कम त्यांच्या सेवानिवृत्तीच्या/ स्वेच्छानिवृत्तीच्या महिन्यातच देण्यास सुरुवात केली आहे तरी अशा सभासदांनी या निवृत्तीच्या महिन्याच्या १० ते १५ दिवसा अगोदर येऊन संस्थेत अर्ज भरुन द्यावेत.

३. सभासदांना वैद्यकीय मदत देताना सभासद जर स्वत: आजारी असल्यास व डिस्चार्ज मिळाल्यापासून तो कार्यालयात हजर राहू न शकल्यास, ज्या दिवशी तो कार्यालयात हजर राहील त्या दिवसापासून आठ दिवसांचे आत सभासदाने लेखी अर्जासह वैद्यकीय कागदपत्रे, तंदूरुस्त प्रमाणपत्र (Fitness Certificate) संस्थेत सादर करावेत.

४. संस्थेच्या कर्जाचा हप्ता व इतर कपात वजा जाता १/३ पगार हातात येणाऱ्या सभासदांचा कर्जासाठी विचार केला जाईल.

५. अनुज्ञेय कर्जाच्या १०% इतकी रक्कम सभासदांच्या खाती भाग रक्कम व वाढती बचत ठेव मिळून जमा असणे आवश्यक आहे कमी असणारी जमा रक्कम अदा करण्यात येणाऱ्या कर्जातून वळते करण्यात येऊन ती रक्कम सभासदांच्या वाढत्या बचत ठेवीत जमा करण्यात येईल.

६. सभासद स्वत: खाली दिलेल्या गंभीर आजाराने पिडीत असेल तर त्याला संस्थेतर्फे त्याच्या सेवाकाळात फक्त एकदाच ₹ २५,०००/- वैद्यकीय मदत देण्यात येईल याची सर्व सभासदांनी नोद घ्यावी.

गंभीर आजार :

१. ह्रदय शस्त्रक्रीयांची प्रकरणे (Heart Surgery) २. ह्रदय उपमार्ग शस्त्रक्रीया (Bye Pass Surgery)

३. ॲन्जिओप्लॅस्टी शस्त्रक्रीया ४. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रीया (Kidney Transplantation)

५. कर्करोग (Cancer)

७. सभासदांच्या प्रथम किंवा द्वितीय यापैकी कोणाही एका पाल्यास इ. १० वी पुढील अभ्यासक्रमासाठी वर्षातून एकदाच शैक्षणिक गरजेकरिता ₹ २५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य नाममात्र शुल्क आकारुन देण्यात येतील याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

८. संस्थेच्या नविन आदर्श उपविधीतील पोट नियम क्रमांक ड - १-१ (अ) नुसार क्रियाशील सभासदाने पाच वर्षातून एका तरी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. याची सभासदांनी नोंद घ्यावी ही विनंती.

महत्वाचे : सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, दिनांक २८ ऑगस्ट २०१९ पर्यंत सर्व सभासदांच्या ज्या बँक खात्यात पगार जमा होतो. त्या बँक खात्यात लाभांशाची रक्कम जमा होणार असल्याने सभासदांनी बँकेतून पासबुक भरुन घ्यावे व जर या खात्याच्या पासबुकामध्ये लाभांशाची नोंद झालेली नसेल तर त्वरीत सोसायटीच्या कार्यालयात संपर्क साधावा ही विनंती.

### कर्जसुविधा व कर्जपरतफेडीच्या हप्त्याचा तक्ता

| सभासदत्वाचा कालावधी | सभासदास मिळणारे कर्ज | परतफेडीचा कालावधी | दरमहा हप्ता | व्याज दर ९.९०% P.A. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ वर्षापासून पुढे सर्वसाधारण कर्ज | ३,००,०००/- पर्यंत | ७५ महिने | ४०००/- | २४७५/- | ६४७५/- |
| | ४,००,०००/- पर्यंत | १०० महिने | ४०००/- | ३३००/- | ७३००/- |
| | ६,००,०००/- पर्यंत | १२० महिने | ५०००/- | ४९५०/- | ९९५०/- |
| ५ वर्षापासून पुढे विशेष कर्ज | ८,००,०००/- पर्यंत | १५० महिने | ५३५०/- | ६६००/- | ११९५०/- |
| | १२,५०,०००/- पर्यंत | १८० महिने | ६९५०/- | १०३१३/- | १७२६३/- |
| १ वर्षापासुन पुढे अल्प मुदत कर्ज | १,००,०००/- पर्यंत | ४० महिने | २५००/- | ८२५/- | ३३२५/- |
| ६ महिने पासुन पढे आकस्मित कर्ज | २०,०००/- पर्यंत | १२ महिने | १७००/- | १६५/- | १८६५/- |

## अहवाल वर्षात संस्थेने राबविलेले उपक्रम

**महिलांकरिता कर्करोगासंदर्भात मार्गदर्शन शिबीर :** नगर दिवाणी व सत्र न्यायालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांकरिता कर्करोग, वस्तूस्थिती व जागरुकता या विषयावर मार्गदर्शन, स्लाईड शो, व खुले चर्चासत्र शनिवार दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबीराकरीता डॉ. वाय. एस. नंदनवार निवृत्त प्राध्यापक (सायन हॉस्पिटल मुंबई) व डॉ. अपर्णा देशपांडे प्राध्यापक (जी.एम. मेडिकल कॉलेज आणि के. ई. एम. हॉस्पिटल परेल) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. जवळ जवळ १५० ते २०० महिलांनी या शिबीराचा लाभ घेतला. सदर शिबीर यशस्वी करण्याकरिता श्री. किर्लोस्कर साहेब, नगर दिवाणी व सत्र न्यायालयाचे रजिस्ट्रार श्री. सुधीर पुरेकर साहेब, असिस्टंट रजिस्ट्रार श्री. चाळके साहेब, नगर दिवाणी व सत्र न्यायालयाच्या सर्व महिला कार्यकर्त्या, संस्थेचे संचालक मंडळ व कर्मचारी यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले.

**गुणवंत विद्यार्थी व सभासद सत्कार समारंभ :** संस्थेच्या गुणवान सभासदांचे व त्यांच्या गुणवान मुलांचे कौतुक करणे आम्हाला नेहमीच अभिमानास्पद वाटते. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इ. १०वी., इ.१२ वी., पदवी, पदवीका व पदव्यूत्तर परिक्षेमध्ये उत्तम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या सभासदांचा व त्यांच्या पाल्यांचा त्याचप्रमाणे सन २०१७-१८ या वर्षात राष्ट्रीय / राज्य / जिल्हास्तरावर कला / क्रिडा / सांस्कृतिक क्षेत्रात विशेष गुणवत्ता अथवा उल्लेखनीय सन्मान मिळविलेल्या सभासदांचा व त्यांच्या पाल्यांचा सत्कार शनिवार दिनांक १६ फेब्रुवारी २०१९ रोजी उच्च न्यायालयाचे सन्माननिय न्यायमूर्ती श्री. इंद्रजित महंती साहेब, तत्कालीन रजिस्ट्रार (O.S.) श्री. चांदवानी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी सन्माननिय न्यायमूर्तींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम किल्ला कोर्ट येथील प्रेरणा हॉल येथे घेण्यात आला होता या हॉलमध्ये सभासद व पाल्यांची उपस्थिती देखील लक्षणीय होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. रवी पवार यांनी केले व आभार प्रदर्शन सौ. सीमा देसाई यांनी केले. या कार्यक्रमासाठी किल्ला कोर्ट येथील प्रेरणा हॉल मिळवून देणारे CMM चे रजिस्ट्रार श्री. हेगडे साहेब, संस्थेचे सभासद, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले.

**<u>सभासद कल्याण निधी :</u>** सभासद कल्याण निधी योजनेअंतर्गत अहवालसालात ६९ सभासदांना त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त/स्वेच्छानिवृत्त झाल्याने व सलग सभासदत्वाची १५/२० वर्ष पूर्ण झाल्याने ₹ ५,०२,५००/- एवढी रक्कम देण्यात आली.

सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत संस्थेने नव्याने सुरु केलेल्या गंभीर आजाराकरीता ३ सभासदांना प्रत्येकी ₹ २५,०००/- एवढी रक्कम ना परतावा वैद्यकीय मदत म्हणून देण्यात आली.

तसेच सभासद कल्याण निधी योजनेअंतर्गत नव्याने सुरु केलेल्या सभासदांच्या पाल्यांना शैक्षणिक गरजेकरीता ८% आर्थिक शुल्काने ६ सभासदांना एकूण ₹ १,३४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य देण्यात आले.

त्याचप्रमाणे सभासद कल्याणनिधी योजनेअंतर्गत अहवाल सालात पुढील ७४ सभासदांना किंवा त्यांच्या कुटूंबियांना वैद्यकीय उपचारांकरीता ₹ ३,६८,३००/- एवढी रक्कम ना परतावा वैद्यकीय मदत म्हणून देण्यात आली.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | श्री. शामकुमार अे. काळे | ५०००/- |
| २. | श्री. विलासकांत जे. माळी | ५०००/- |
| ३. | श्रीमती सुषमा एस. धनावडे | ५०००/- |
| ४. | श्री. नामदेव के. सोनार | ५०००/- |
| ५. | श्री. चंद्रकांत प्र. पाटील | ५०००/- |
| ६. | श्री. नथू के. घारे | ५०००/- |
| ७. | श्री. दत्तात्रंय गं. महांगडे | ५०००/- |
| ८. | श्री. विश्वनाथ का. महाडीक | ५०००/- |
| ९. | श्रीमती अश्विनी आर. बावकर | ५०००/- |
| १०. | श्री. मिलिंद अे. किनलेकर | ५०००/- |
| ११. | श्री. दिपक डी. सातपूते | ५०००/- |
| १२. | श्री. गौरव एन. मगर | ५०००/- |
| १३. | श्री. विभाकर आर. मुक्ते | ५०००/- |
| १४. | श्रीमती मिनल एस. प्रधान | ५०००/- |
| १५. | श्री. किरण आर. पिंपरे | ५०००/- |
| १६. | श्री. आशिष तु. भोईर | ५०००/- |
| १७. | श्री. प्रमोद स. रसाळ | ५०००/- |
| १८. | श्री. विनायक वा. पालव | ५०००/- |
| १९. | श्री. देवेंद्र ता. राऊत | ५०००/- |
| २०. | श्री. सुरेश आ. वारभवन | ५०००/- |
| २१. | श्रीमती किरण एस. आरोळकर | ५०००/- |
| २२. | श्री. दत्तराज टी. बागवे | ५०००/- |
| २३. | श्रीमती श्रावणी एस. सावंत | ५०००/- |
| २४. | श्रीमती नंदा एम. जाधव | ५०००/- |
| २५. | श्री. अब्दुल एच. हमदरे | ५०००/- |

| अ.क्र. | सभासदाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| २६. | श्री. श्रीधर एम. कारंजकर | ५०००/- |
| २७. | श्री. कासिमशा आय. पटेल | ५०००/- |
| २८. | श्री. मयुरेश डी. सुभेदार | ५०००/- |
| २९. | श्री. सिताराम एम. मोरे | ५०००/- |
| ३०. | श्रीमती स्मिता जे. कोलासो | ५०००/- |
| ३१. | श्री. विजय व्ही. काकडे | ५०००/- |
| ३२. | श्री. रविकांत व्ही. माने | ५०००/- |
| ३३. | श्री. चंद्रशेखर अे. सुर्यवंशी | ५०००/- |
| ३४. | श्री. समैक जे. गायकवाड | ५०००/- |
| ३५. | श्री. मनोज एन. पाटील | ५०००/- |
| ३६. | श्री. कमलाकर बी. लोंढे | ५०००/- |
| ३७. | श्री. सुदेश जी. पाटील | ५०००/- |
| ३८. | श्री. संतोष एम. गाडे | ५०००/- |
| ३९. | श्री. प्रशांत सी. कारखानीस | ५०००/- |
| ४०. | श्री. सुरज एस. शिंदे | ५०००/- |
| ४१. | श्रीमती समृध्दी एस. चिपकर | ५०००/- |
| ४२. | श्री. राजेश जी. नाईक | ५०००/- |
| ४३. | श्री. प्रकाश डी. शिंदे | ५०००/- |
| ४४. | श्री. विष्णू आर. आसवले | ५०००/- |
| ४५. | श्री. पल्हाद एन. थोरात | ५०००/- |
| ४६. | श्री. संतोष एन. घाटोळे | ५०००/- |
| ४७. | श्रीमती प्रिती आर पाटणकर | ५०००/- |
| ४८. | श्री. राजेंद्र जे. कदम | ५०००/- |
| ४९. | श्री. मिलिंद एस. धुरी | ३३००/- |
| ५०. | श्रीमती वैशाली एस. वाघमारे | ५०००/- |

| अ.क्र. | सभासदाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| ५१. | श्री. बाळकृष्ण डी. जगदाळे | ५०००/- |
| ५२. | श्रीमती जयश्री बी. लाडके | ५०००/- |
| ५३. | श्री. सतिश एम. पोळ | ५०००/- |
| ५४. | श्री. संतोष व्ही. आंगणे | ५०००/- |
| ५५. | श्री. गिरीश टी. शेटगे | ५०००/- |
| ५६. | श्री. आशुतोष एस. पोयरेकर | ५०००/- |
| ५७. | श्री. मनोहर आर. कांबळे | ५०००/- |
| ५८. | श्री. प्रविण आर. म्हसकर | ५०००/- |
| ५९. | श्री. विवेक एल. जोशी | ५०००/- |
| ६०. | श्री. उमेश जे. पाटील | ५०००/- |
| ६१. | श्रीमती ज्योती एस. म्हशीलकर | ५०००/- |
| ६२. | श्रीमती तृप्ती एस. गायकर | ५०००/- |
| ६३. | श्री. शालिकराम पी. बोरे | ५०००/- |

| अ.क्र. | सभासदाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| ६४. | श्री. मनेश अे. कुंभारगण | ५०००/- |
| ६५. | श्री. कृष्णा के. नाईक | ५०००/- |
| ६६. | श्री. वसंत अे. इधोल | ५०००/- |
| ६७. | श्री. वासुदेव एस. पाटील | ५०००/- |
| ६८. | श्री. संतोष बी. बनसोडे | ५०००/- |
| ६९. | श्री. संजय व्ही. चव्हाण | ५०००/- |
| ७०. | श्री. तानाजी एन. भितळे | ५०००/- |
| ७१. | श्री. सुधीर एस. जमदाळे | ५०००/- |
| ७२. | श्री. प्रकाश एस. करंबळे | ५०००/- |
| ७३. | श्री. श्रीनिवास एम. कामतेकर | ५०००/- |
| ७४. | श्री. भगवान वाय. डोंबाळे | ५०००/- |
| | एकुण ₹ | ३६८३००/- |

<u>मयत सभासद मदत निधी :</u> या योजनेअंतर्गत अहवाल सालात ९ सभासदांचे निधन झाले त्यांच्या वारसदारांना प्रत्येकी ₹ १०,०००/- एवढी रक्कम देण्यात आली.

<u>भावपूर्ण श्रध्दांजली :</u> अहवालसालात संस्थेचे जे सभासद निधन पावले अशा सभासदांच्या कुटूंबियांच्या दुःखात संस्था सहभागी असून मृतांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

<u>अभिनंदन :</u> सन १९१८-१९ या शैक्षणिक वर्षात इ. १० वी, इ. १२ वी, पदवी, पदविका व पदव्यूत्तर परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व सभासदांचे व त्यांच्या पाल्यांचे हार्दिक अभिनंदन. या गुणीजन सभासदांचा व त्यांच्या पाल्यांच्या गुणगौरव समारंभाची तारीख लवकरच जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आभार :

आदरणीय मुख्य न्यायमूर्ती व इतर सर्व सन्माननीय न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय.

माननीय महाप्रबंधक, आणि सर्व माननीय प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.

माननीय प्रोथोनोटरी ॲण्ड सिनियर मास्टर, मुंबई उच्चन्यायालय व त्याखालील सर्व संलग्न कार्यालये प्रमुख.

माननीय प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी न्यायालय व त्यांचे सहकारी.

माननीय प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय व त्यांचे सहकारी.

माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व त्यांचे सहकारी.

माननीय सर्व सरकारी वकिल व त्यांची कार्यालये.

सर्व आस्थापना व रोख विभागातील कर्मचारी.

यांचे बहूमोल सहकार्य व मार्गदर्शन संस्थेस लाभले त्याबद्दल या सर्वांचे संस्था आभारी आहे.

अहवाल वर्षात सहकार विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबै बँक, सारस्वत बँक, बँक ऑफ इडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, अभ्युदय बँक, जनकल्याण बँक, एन. के. जी.एस.बी. बँक, पंजाब ॲण्ड महाराष्ट्र बँक यांचे

अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी देखील संस्थेच्या कामात मदत केली आहे त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार.

शासकीय लेखापरीक्षक श्री. चंदन गुप्ता (सर्टिफाईड ऑडिटर), अंतर्गत लेखापरिक्षक श्रीमती तृप्ती बगाडे (चार्टर्ड अकौन्टन्ट), कर लेखापरिक्षक श्री. आर. एस. धावडे (चार्टर्ड अकौन्टन्ट) यांचे देखील आभार.

त्याचप्रमाणे संस्थेच्या सेवक वर्गाने केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे देखील आभार.

धन्यवाद!

संचालक मंडळ

## सभासद कल्याण निधीच्या नियमावलीतील दुरुस्ती व नवनिर्मिती

नियम क्र. ६, ३ फ नूसार अधिक समाविष्ट केलेला परिच्छेद : गंभीर आजारासाठी वैद्यकीय मदत

सभासदास गंभीर आजाराकरीता मदत देताना सभासद जर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असेल व त्यावेळी त्याला उपचाराकरीता ₹ २५,०००/- पर्यंत खर्चाची आवश्यकता असेल तर अशा वेळी त्याला ती रक्कम अर्ज केल्यानंतर ज्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असेल त्या हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रमाणपत्रासह (उपचाराकरीता लागणाऱ्या खर्चाच्या तपशीलासह) त्वरीत देण्यात यावी व डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांनी संस्थेत १ महिन्याच्या आत डिस्चार्ज कार्ड/शस्त्रक्रीया उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची बीले जोडणे आवश्यक असेल. ही कागदपत्रे जर सभासदाने १ महिन्याच्या आत संस्थेत सादर न केल्यास किंवा ती कागदपत्रे बोगस, फसवी आढळल्यास देण्यात आलेली वैद्यकीय मदत त्या सभासदाकडून पाच समान हप्त्यांत वसुल करण्यात येईल.

नवनिर्मित ६, (१ ब) नुसार : सभासदांच्या दैनंदिन वाढत्या गरजा लक्षात घेवून सभासद कल्याण निधीतून सभासदांसाठी अल्पशुल्काने १२/१८/२४ महिन्याच्या समान मासिक हप्त्याने गृहपयोगी वस्तू, शैक्षणिक साहित्य, दुचाकी वाहनांकरीता आर्थिक सहाय्य पुढील तक्त्यानूसार खालील अटींची पूर्तता केल्यास प्राप्त होवू शकेल.

| प्रकार क्र. | तपशील | परतफेडीचा कालावधी | आकारण्यात येणारे शुल्क | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|---|---|
| १. | टिव्ही/फ्रिज/वॉशिंग मशिन/ए.सी./ होम साउंड सिस्टिम | १२/२४ | ८.५०% | जास्तीत जास्त ₹ ७५,०००/- पर्यंत |
| २. | कॉम्प्यूटर/लॅपटॉप/शैक्षणिक साहित्य | १२/१८ | ८% | जास्तीत जास्त ₹ ५०,०००/- पर्यंत |
| ३. | दुचाकी वाहने | १२/२४ | ८.५०% | जास्तीत जास्त ₹ ७५,०००/- पर्यंत |

१. सभासद हा संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या अन्य कोणत्याही कर्जाचा थकबाकीदार नसावा.

२. या वस्तू व साधने घेण्याकरीता मिळणाऱ्या आर्थिक सहाय्याकरीता सभासदांच्या लेखी अर्जासह निविदा (Quotation) जोडणे आवश्यक आहे.

३. हे आर्थिक सहाय्य उपलब्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत अर्जदारास खरेदी केलेल्या वस्तू/साधनांचे (G.S.T.) नंबर असलेले पक्के बिल संस्थेत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा या आर्थिक सहाय्याची रक्कम सभासदांच्या पगारातून वसुल केली जाईल.

४. सभासदास एका वेळी प्रकार क्रमांक १ ते ३ पैकी फक्त एकाच प्रकारातील हे आर्थिक सहाय्य उपलब्ध होईल. तसेच या देण्यात आलेल्या आर्थिक सहाय्याची जेवढ्या मासिक हप्त्याची मुदत असेल ती मुदत संपल्यानंतर अर्जदारास पुन्हा अन्य प्रकारातील वस्तू व साधनांसाठी आर्थिक सहाय्याकरीता अर्ज करता येईल.

५. सभासद कल्याण निधीतील रकमेच्या उपलब्धतेनुसार सदर आर्थिक सहाय्य देण्यात येईल. या आर्थिक सहाय्याकरीता सभासदांकडून जे शुल्क आकारण्यात येईल ते त्या-त्या वर्षात कमी/जास्त करण्याचा अधिकार संस्थेच्या संचालक मंडळाकडे राहील.

६. या आर्थिक सहाय्यातील मिळणारे सेवाशुल्क संस्थेच्या उत्पन्नात जमा करण्यात येईल.

## कर्ज सुरक्षा निधि नियमावली

१. या नियमास दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड. मुंबई, कर्जसुरक्षा निधिचे नियम असे संबोधावे.

२. अ) ज्या दिवशी उपनिबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, मुंबई हे या नियमास मंजूरी दिल्याचे दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड. मुंबई, या संस्थेस कळवतील त्यानंतर कार्यकारी मंडळ जी तारीख नक्की करेल त्या दिवसापासुन यातील नियम अंमलात येतील.

ब) दि हायकोर्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड. मुंबई, असा प्रत्येक वेळी उल्लेख न करता सोयीच्या दृष्टीने "संस्था" असा यापूढे उल्लेख केला जाईल.

क) हे कर्ज सुरक्षा निधीचे नियम कर्ज रक्कम ₹ १,००,०००/- व त्या पुढील कर्ज रकमेकरीता सर्व कर्जदारास बंधनकारक राहतील.

ड) संस्थेच्या ज्या सभासदाने आपल्या सभासदत्वाचे १ वर्ष पूर्ण केले असेल व सुरवातीस कर्ज देताना त्याची ज्या तारखेस कर्जसुरक्षा निधि पोटी रक्कम कपात करण्यात येईल त्या तारखेपासून ३ महिन्यानंतर तो या कर्जसुरक्षा निधी योजनेचा लाभार्थी असेल.

इ) सदर निधिच्या व्यवस्थापनासाठी संचालक मंडळ कार्यवाहांच्या अध्यक्षतेखाली एकूण पाच व्यक्तींची कर्ज सुरक्षा निधि समितीवर नेमणूक करेल व या समितीचा कालावधी संचालक मंडळाप्रमाणे राहील तथापी पदसिद्धअध्यक्षांच्या व्यतीरीक्त इतर ४ सभासदांचा कालावधी त्यांच्या नेमणूकीपासून १ वर्षाचा राहील.

३. निधिचा उद्देश

१. कर्ज शिल्लक असताना सभासदाचा नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाला तर प्रथम त्याची संस्थेतील सर्वप्रकारची जमा रक्कम कर्जाला वर्ग करुन त्यानंतर त्याचे शिल्लक राहीलेले संपूर्ण कर्ज या कर्ज सुरक्षा निधिमधुन वळते करण्यात येईल.

४. कर्जसुरक्षा निधिची उभारणी किंवा निर्मिती :

अ) दिर्घ मुदत कर्ज, विशेष कर्ज किंवा अल्पमुदत कर्ज घेताना सर्व कर्जदार सभासदांकडून मंजूर कर्ज रकमेच्या २% एवढी रक्कम कर्जसुरक्षा निधि पोटी कर्जातून कपात करण्यात येईल. ही कर्ज सुरक्षा निधी रक्कम पगारातून कापून घेण्याबाबतचे संमती पत्र कर्जदारास संस्थेस देणे बंधनकारक राहिल. कर्जदार त्याचे कर्ज ज्या कालावधीकरीता घेईल त्या कालावधीपर्यंतच किंवा त्याचे ते कर्ज ज्या कालावधीपूर्वी परतफेड केले त्या कालावधीपर्यंतच त्याच्या कर्जास सुरक्षा मिळेल.

निम्म्या कर्जाची परतफेड केल्यानंतर जे कर्जदार ज्या ज्या वेळी नव्याने कर्जासाठी अर्ज करतात त्यांची त्या त्या कर्जाकरीता पुन्हा नव्याने १% एवढी रक्कम कर्जसुरक्षा निधि पोटी कर्जातून कपात करण्यात येईल.

जे कर्जदार त्यांचे संपूर्ण कर्ज दिलेल्या मुदतीत किंवा मुदतीपूर्वी परतफेड करतील असे कर्जदार जर पुन्हा नवीन कर्जाकरीता अर्ज करीत असतील तर त्यांना त्यांच्या अगोदरच्या कर्जसुरक्षा निधि पोटी घेतलेल्या २% एवढ्या रकमेस जी रक्कम कमी पडेल तेवढी रक्कम या कर्जसुरक्षा निधि पोटी कर्जातून कपात करण्यात येईल.

